# अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३८ /२०२४ दि. १२/११/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

ज्याअर्थी, **अंबरनाथ** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने शिवसेना पक्षाचे १४० अंबरनाथ (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ.श्री. बालाजी प्रल्हाद किणीकर यांच्या प्रचारार्थ दिनांक १३/११/२०२४ रोजी दुपारी १४:०० वा. स्मशान भुमी ते गोविंदतिर्थ पुलच्या दरम्यान सभा होणार आहे.** सदरवेळी त्यांचे प्रचारार्थ परिसरात मोठया प्रमाणात महायुतीतील पक्षाचे कार्यकर्ते येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद–** १) वैभव हॉटेल कडुन मटका चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **वैभव हॉटेल** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने वैभव हॉटेल येथुन टि पॉईट पुढे डावे बाजुला वळुन फॉरेस्ट नाका येथुन डाव्या बाजुने वळुन पुढे अंबरनाथ मार्गे उल्हासनगर व कल्याण मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) मटका चौका कडुन वैभव हॉटेल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **मटका चौक** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने मटका चौक येथुन सरळ जावुन फॉरेस्ट नाका येथुन उजवे बाजुला वळुन टि पॉईट मार्गे बदलापुर शहरामध्ये व पुढे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) वैभव हॉटेल कडुन मटका चौक कडे जाणारी सर्व प्रकारच्या छोटया वाहनांना गोविंदतिर्थ कडे जाणारी एकेरी वाहतुक **हिंदु स्मशानभुमी** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** हिंदु स्मशानभुमी येथे गोविंदतिर्थ कडुन येणाऱ्या वाहीनीवरून दुहेरी वाहतुक पुढे चालु राहील किंवा हिंदु स्मशानभुमी येथुन शिवाजीनगर पोलीस ठाणे मार्गे, रोटरी क्लब समोरून समर्थ चौक मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक १२/११/२०२४ रोजी १५:०० पासुन ते दिनांक १३/११/२०२४ रोजी बंदोबस्त संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व निवडणुकीची वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर

मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर

मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner